## जिल्हा न्यायालय, गोंदिया
## कार्यालयीन आदेश

क्रमांक बी–४(१)/ ६९६ /२०११,गोंदिया, दिनांक ०४ सप्टेंबर,२०१८.

पहा :–१. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र क्रमांक बी–(जनरल) ५६०१/५७/२०१८/११५३, दि. १४/०९/२०१८.

२. जिल्हा न्यायालय, गोंदिया लघुलेखक(निम्नश्रेणी) पदाची निवड/प्रतिक्षा यादी दि.२४/०९/२०१८.

मा.उच्च न्यायालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक १ मध्ये निर्देशीत करण्यांत आलेल्या अटी व शर्ती नमुद करुन जिल्हा न्यायालय,गोंदिया मार्फत दिनांक २४/०९/२०१८ रोजी लघुलेखक निम्नश्रेणी पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

लघुलेखक (निम्नश्रेणी) पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना तदर्थ स्वरुपात नेमणूक देणेबाबत मी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गोंदिया खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

**लघुलेखक (निम्नश्रेणी) पदाची वेतनश्रेणी ९३००—३४८००/— ग्रेड पे.४३००/—**

| अ.क्र. | उमेद्वाराचे नांव | पदस्थापना |
|---|---|---|
| १ | श्री शरद मानिकराव मराठे, घर क्रमांक ३६,विवेक कॉलोनी, महाबल रोड,जलगांव ४२५००१ | लघुलेखक(निम्नश्रेणी), ४थे सहदिवाणी न्यायालय, क.स्तर गोंदिया येथे रिक्त असलेल्या पदावर. |

<u>नोट</u> :—**जिल्हा न्यायालय,गोंदिया यांचे कार्यालय आदेश क्रमांक बी—४(१)/४३२/२०११, दिनांक २६ जून,२०१८ प्रमाणे श्री डी.एच.धोपटे लघुलेखक (निम्न श्रेणी) यांची ४थे सहदिवाणी न्यायालय,क. स्तर गोंदिया येथे करण्यांत आलेली प्रतिनियुक्ती या आदेशान्वये रद्द करण्यांत येत आहे.**

## अटी व शर्ती

१. उमेदवारास भारताच्या संविधानाप्रती गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

२. उमेदवारास मद्यपान न करण्याबाबत वचननामा द्यावा लागेल.

३. उमेदवारास आपले पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास, एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन शासनास जमा करावे लागेल.

४. सदरची नेमणूक पुर्णपणे तदर्थ स्वरुपाचे आहे आणि पोलीसांकडून पुर्व चारित्र्य अहवाल असमाधानकारक प्राप्त झाल्यास किंवा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास पुढील आदेशाद्वारे कोणतीही पुर्व सुचना/नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

५. सदरची नेमणूक दोन वर्षाचे परिविक्षाधिन कालावधीकरिता असले तरीही न्यायालय कमी झाल्यामुळे सेवेची गरज नसल्यास सेवेतुन कमी करण्यात येईल.

६. निवड यादीतील उमेदवारांना आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत नेमणूकीचे पदावर रुजू व्हावे लागेल अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द होईल.

७. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही–२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १/७/२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ''अ'' भरुन आहरण व संवितरण अधिका–यांना सादर करावे लागेल.

८. उमेदवारांनी आपले पदावर रुजू होतेवेळी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे स्वास्थ प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

९. उम्मेदवाराची नियुक्ती तदर्थ स्वरुपाची असुन त्यांनी इंग्रजी व मराठी श्रृतलेखन इंग्रजी (Dictation) चाचणी परिक्षा नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाचे आंत उत्तीर्ण करावी लागेल अन्यथा त्यांची सेवा त्या कालावधीनंतर समाप्त करण्यांत येईल तसे त्यांना बंधपत्र रुजू होण्यापूर्वी सादर करावी लागेल.

१०. उम्मेदवाराचे निवड तदर्थ स्वरुपाचे असल्यामुळे त्यांनी त्यांचे नेमणुकीपुर्वी खालील आशयाचे बंधपत्र कार्यालयास लिहून देणे आवश्यक आहे.

**<u>बंधपत्र</u>**

मी,.................................................. बंधपत्र लिहून देतो की, माझी लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदावरील नेमणूक तदर्थ (Adhoc basis) स्वरुपाची आहे. तसेच वर नमूद करण्यांत आलेल्या चाचणी परीक्षांपैकी ज्या ज्या चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे मला बंधनकारक आहेत ती प्रत्येक परीक्षा मी माझे नेमणूकीच्या दिनांकापासून एक वर्षाचे आंत उत्तीर्ण न झाल्यास सदरसेवेतून मला मुक्त करण्यांत येईल याची मला कल्पना आहे.

करीता हे बंधपत्र.

दिनांक : स्वाक्षरी

ठिकाण: उम्मेदवाराचे नांव व प्रतिक्षा यादीतील अ.क्र.

या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचा—यांस निर्देश देण्यात येते की, त्यांनी आपल्या पेदाचा पदभार ग्रहण केल्याची माहिती या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

(कमलाकर अ.कोठेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
गोंदिया.
अंकन कमांक बी—४(१)/४०९५/२०११

<u>प्रतिलिपी</u> —

१. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, गोंदिया.
२. ३रे/४थे सहदिवाणी न्यायालय,क.स्तर गोंदिया.
३. सहायक अधिक्षक (अर्थ व वित्त विभाग) जिल्हा न्यायालय, गोंदिया.
४. अधिक्षक/वरिष्ठ लिपिक (प्रशासन विभाग) जिल्हा न्यायालय, गोंदिया.
५. श्री शरद मानिकराव मराठे,घर कमांक ३६,विवेक कॉलोनी, महाबल रोड,जलगांव ४२५००१(रजिस्टर्ड पोष्टाव्दारे)
६ जिल्हा शल्य चिकित्सक, शासकिय रुग्णालय, गोंदिया
यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
७. श्री डी. एच. धोपटे, लघुलेखक (नि.श्रे.), म.न्या. गोरेगाव

५.१०.१८
(कमलाकर अ.कोठेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
गोंदिया.

जिल्हा न्यायालय, गोंदिया
दिनांक ~~सप्टेंबर~~,२०१८.. ५/१०/१८